ISSN 2278-8808 IMPACT FACTOR: 1.38
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# शाश्वत विकासासाठी शिक्षण

**प्रा.योगेश खंडेराव पाटील**
**अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर**
**पुणे ०९**

**डॉ.शोभा वि.कागदे**
**प्राचार्या अध्यापक महाविद्यालय अरण्येश्वर**
**पुणे ०९**

---


**प्रस्तावना :**

मानव जात सतत उत्क्रांत होत असलेल्या विश्वाचाच एक भाग आहे. वैज्ञानिक प्रगतीच्या सहाय्याने मानवाचे निसर्गावर अधिराज्य गाजविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.सभोवतालच्या परिस्थितीमुळे मानवी जीवनाचे ध्येय जास्तीत जास्त भौतिक सुख मिळवणे हेच असल्याचे जाणवत आहे.प्रगतीची अनेक शिखरे पार करण्याच्या मानवाला पृथ्वीच्या प्रदिर्घ इतिहासतल्या अत्यंत नाजूक टप्प्यावर आपण येऊन पोहचल्याची जाणीव दिसत नाही.

प्राचीन काळी शिक्षणाचा हेतू मोक्षप्राप्ती , ज्ञानप्राप्ती चार ॠणांची उतराई होण्यासाठी आवश्यक अशा पध्दतीचे शिक्षण दिले जात असे. आजच्या परिस्थितीकडे पाहता केवळ भौतिक समृध्दी प्राप्त करणे हाच शिक्षणाचा मुख्य हेतू बनला आहे. अशा संकुचित उद्देशाने शिक्षणाकडे पाहिल्यामुळे समान भवितव्याने बांधल्या गेलेल्या एकाच मानवी कुटूंबाचे आपण सारे अविभाज्य घटक आहोत ही बाब आपण विसरत आहोत. म्हणूनच निसर्गाप्रती आदर, व्यापक मानव अधिकार, आर्थिक न्याय आणि शांततेची बूडा

राखाणारी संस्कृती या चतुःसुत्री वर आधारित शाश्वत वैश्विक समाजाची निर्मिती करण्यासाठी शाश्वत विकासासाठी शिक्षण गरजेचे आहे .

## १ . शाश्वत विकासाचे चार स्तंभ –व्याप्ती



**१ . आर्थिक स्तंभ   २ . सामाजिक स्तंभ   ३ . सांस्कृतिक स्तंभ   ४ . पर्यावरणीय स्तंभ**

### १ . आर्थिक स्तंभ

१ . शाश्वत उपजिविकेसाठी प्रत्येक व्यक्तीला शिक्षण व संसाधने पुरवूण सक्षम करणे .

२ . देशांतर्गत आणि आंतराष्ट्रीय स्तरावर संपतीचे न्याय वाटप करण्याचा पुरस्कार करणे .

३ . भावी पिढयांनाही आर्थिक लाभ होतील आशा पध्दतीचे आर्थिक धोरण स्वीकारणे .

४ . राष्ट्रीय विकास करताना पर्यावरणाला कोणत्याही प्रकारची हानी न पोचवता सर्व लोकांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करणे .

### २ . सामाजिक स्तंभ

१ . प्रत्येक मानवाच्या ठायी असलेल्या आत्मसन्मानाची कदर करणे .

२ . न्याय जनसहभागी, शाश्वत आणि शांतता प्रिय आशा लोकशाहीवादी समाजाची निर्मिती कारणे .

३ . शाश्वत विकासासाठी लैंगिक समानता व समता आवश्यक आहे . हे अधोरेखित करणे .

४ . सर्वांना शिक्षण, आरोग्य सेवा व आर्थिक प्रगतीच्या संधी उपलब्ध होतील अशी व्यवस्था करणे

५ . सर्व स्तरावर लोकशाहीचे सबलीकरण करणे

## ३ .सांस्कृतिक स्तंभ

१ . सांस्कृतिक व आध्यात्मिक दृष्टया अनन्य साधारण महत्व असलेल्या स्थळांची देखभाल व संरक्षण करणे .

२ . सहिस्णुता, अंहिसा आणि शांतातेची संस्कृती रूजवणे .

## ४ .पर्यावरणीय स्तंभ

१ . पर्यावरणाचे नुकसान टाळणे हाच पर्यावरणाच्या रक्षणाचा सर्वोत्तम उपाय असल्याने तशी पाावले उचलणे .

२ . जैवविविधता व जीवसृष्टीची अक्षयता कायम राखणे .

३ . पर्यावरण संवर्धन व पुनर्वसन हे सर्व विकासकामाचे अविभाज्य घटक ठरवणे .

४ . पर्यावरणाला घातक अशा लष्करी कृती / कारवाया टाळणे .

५ . ज्याचे साठे मर्यादित आहेत अशा खनिज संपत्तीच्या व इंधनस्त्रोताच्या उपशावर व वापरावर नियंत्रण ठेवणे .

६ . पर्यावरणाची शाश्वतता वाढावी यासाठीच्या अभ्यास / संशोधनास पाठबळ देणे .


## २ .शाश्वत विकासाचा अर्थ ः

इंग्रजीमध्ये Sustainable development या शब्दासाठी शाश्वत, चिरंजीव व चिरंतर विकास असे शब्द वापरले जातात .

## व्याख्या ः

"सध्याच्या पिढीला गरजांची पूर्तता भविष्यातील पिढीच्या गरजा भागविण्यासाठीच्या क्षमता अबाधित राखून करणे म्हणजे शाश्वत विकास होय". **ब्रंटलॅण्ड आयोग १९८७**

## ३. शाश्वत विकासासाठी शिक्षणाचे शालेय स्तरावर स्वरूप




## ४. शिक्षक प्रशिक्षणामध्ये शाश्वत विकासासाठी शिक्षण


| अ.क | कोर्स /पेपर | उपघटक | प्रात्यक्षिक कार्य/ उपक्रम |
|---|---|---|---|
| १ | नवकाळासाठी शिक्षण | -शाश्वत विकासामध्ये समाजाची भूमिका<br>-बहुभाषिक, बहुधार्मीक, बहुसांस्कृतिक | -शाश्वात विकासासाठी शिक्षण देण्यासाठी कार्यनितीचा विकास |

| | | | |
|---|---|---|---|
| | | समाजात शिक्षकाची भुमिका . <br> -सामाजिक दुहिचे कारणे परिणाम उपाय - <br> -संधीची समानता . <br> -सामाजिक परंपराचे विश्लेषण <br> -बदलत्या काळातील विकासच्या संकल्पना . | करणे . <br> -शासकीय व अशासकीय संस्थाची शाश्वत विकासासाठीच्या कार्याची माहिती जमा करणे . |
| २ | अध्ययनाचे व विकासाचे मानसशास्त्र | -लिंग समभाव विषयक संवेदनशिलता <br> -सर्व समावेशक शिक्षण <br> -मानवी हक्क शिक्षण | -माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा शाश्वत विकासाबाबत दृष्टीकोणाचा अभ्यास . <br> -प्रदूषणाचा मानसिक आरोग्यावर होणार परिणामाचा शोध . |
| ३ | शैक्षणिक व्यवस्थापन तत्वे व कार्यवाही | -व्यवस्थापनाची शाश्वत विकासबाबत भूमिका <br> -संपूर्ण गुणवत्तेत शाश्वत विकासाचे स्थान <br> -संस्थानिहाय नियोजन शाश्वत विकास | -शाळा संकुलांचा शाश्वत विकासाबाबत केलेल्या कार्याचा आढावा घणे . <br> -शाश्वत विकासाबाबत शाळाना नवोपकम सुचवणे . |
| ४ | माहिती संप्रेषण तंत्रज्ञान | -माहिती संप्रेषण तंत्रज्ञानातून रोजगार निर्मिती | -शाश्वत विकासच्या विषायासंबधी Ppt सादरीकरण . <br> -शाश्वत विकासाच्या शिक्षणासाठी ICT साधनांचा वापर (सोशल मिडिया इंटरनेट) |
| ५ | विषय शिक्षण | -माध्यमिक सतरावरील सर्व पाठ्यपुस्तकामधील शाश्वत विकासाच्या दृष्टीकोनातून आशय विश्लेषण . | |

| | | |
|---|---|---|
| ६ | सराव पाठ छात्र सेवाकाल | –शाश्वत विकासाबाबत पाठातील संदेश ओळखून त्याचे अध्यापपनासाठी विशेष प्रयत्न करणे .<br>–परिपाठाच्या वेळी शाश्वत विकासाबाबतच्या उपक्रमांची आखणी करणे .<br>–वर्गात चित्रे, तक्ते, पोस्टरच्या माध्यमातून शाश्वत विकासाबाबत जागृती .<br>–शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहभागातून शाश्वत विकासाबाबत भित्तीपत्रकामध्ये निबंध, कविता, लेख, चित्रे यांचा संग्रह . |
| ७ | अभ्यासानुवर्ती कार्यक्रम | –विशेष व्याख्यानांचे आयोजन, फिल्म, गटचर्चा, सेमीनार सादरीकरण, पथनाटय, समाजसेवा, प्लॅस्टिक विरोधी मोहिम, वृक्षारोपन, क्षेत्र भेटी जनजागृती कार्यक्रम इ . |

## ५ . शाश्वत विकासाच्या शिक्षणासाठी अध्ययन अध्यापन पध्दती

**विद्यार्थाच्या वर्तनात बदल अभिप्रेत आसल्याने शाश्वत विकासाच्या शिक्षणासाठी जास्तीत जास्त बालक केंद्रित पध्दतीचा वापर करणे गरजेचे आहे .**




## ६ . शाश्वत विकासामध्ये शिक्षकाची भुमिका ः

१ . पर्यावरण संवर्धन, सामाजिक व आर्थिक न्याय मानवता इ . बाबत मूल्ये, दृष्टिकोन, कौशल्य स्वःतामध्ये विद्यार्थ्यामध्ये रूजवणे .

२ . विद्यार्थ्यामध्ये स्वतंत्र्य विचार शक्तिचा व दूरदृष्टीचा विकास साधने .

३ . पर्यावरण रक्षकाची भुमिका पार पाडणे .

३ . विद्यार्थ्यांना स्वंय अध्ययनासाठी प्रेरणा देणे .

४ . विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक व सामाजिक कौशल्य विकसित व्हावीत म्हणून प्रयत्नशील राहणे .

## समारोप ः

केवळ भौतिक सुखाची प्राप्ती करून घेण्यासाठी मदत करणाया शिक्षणापेक्षा जीव सृष्टीच्या शाश्वततेबाबत मदत करणारे शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यासाठी सुरूवातीला शिक्षण प्रशिक्षणात व टप्याटप्याने शिक्षणाच्या वेगवेगळया स्तरावर बदल करणे आजच्या काळाची गरज बनली आहे .

## संदर्भग्रथ ः


१ . अहिरराव वा . र . (२००५)' पर्यावरण शिक्षण' निराली प्रकाशन, पुणे .

२ . पथिक कृ . इ . (ऑक्टोबर २०१२) 'पर्यावरण शिक्षणात शाश्वत शिक्षणाची भुमिका' शिक्षण संक्रमण, पान क्र . ११० .

३ . भोसले रमा डोणे उज्वला (२००९) 'शिक्षणातील बदलते विचार प्रवाह' फडके पब्लिकेशन , कोल्हापूर .

४ . सांगोलकर अरूण (२०१०)' नविन जागतिक समाजातील शिक्षणाचे विचार प्रवाह'इनसाईट पब्लिकेशन, नाशिक .

http://www.earthcharterinaction.org/content/